मार्च.

संपादकीय

आमच्या जानेवारीच्या अंकांतील 'दुनिया न माने' (कुंकू) या बोलपटाच्या परीक्षणावर अनेकांनी अनेक अभिप्राय दिले व इतका लांब लेख लिहिण्याचें कारण नव्हतें असेंही कित्येकांनी सांगितलें. तथापि एका दृष्टीने त्याची अत्यंत जरूरी होती असें आतां दिसून येतें, कारण त्या लेखामुळे सदर बोलपटाची आमचेकडील जाहिरात बंद झाली. यामुळे आम्हास विशेष आश्चर्यही वाटलें नाही, कारण जाहिरातींच्या मोबदल्यांत स्वतःचा उदोउदो करून घेण्यास चटावलेल्या दिग्दर्शकांना कोणीं आपले दोष दाखवलेले कसे खपणार! त्यांचे मतें स्वतःमधे दोष नसतातच, तेव्हा दोष दाखवणें शक्यच नाही, फक्त दोषारोपच शक्य असतो. तेव्हा असा दोषारोप करणारास जाहिराती कशा द्याव्या? तथापि पैसे घेऊन खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करण्याची आमची तयारी नाही, आणि 'प्रभात' कंपनीचा हिंदुस्थानांत देखील पहिला नंबर लागत नाही, मग या दिग्दर्शकांना एवढी घमेंड पाहिजे कशाला? ही कंपनी बऱ्यापैकीं आहे, म्हणूनच दोष दाखवण्यांत कांहीं अर्थ होता. तेही आम्हीं सर्वच सांगितले नाहीत, उदाहरणार्थ शकुंतलाबाईंच्या अंगांतला एक रशियन पद्धतीचा ब्लाउज पाहून दिग्दर्शक महाशय इतके खूष झाले की औचित्याचा विचार बिलकूल न करतां त्यांनी तसाच एक ब्लाउज त्यांच्या भूमिकेकरतां करायला दिला! आम्हीं सर्व दोष दाखवले नाहीत इतकेंच नव्हे, तर एकंदरींत बोलपट पाहण्यासारखा आहे असेंही लिहिलें, व त्यांनी जाहिरात बंद केली तरी तेंच पुनः लिहितों. परंतु जें निर्दोष नाही त्याला निर्दोष म्हणण्याची मात्र आमची तयारी नाही.

आमच्या जाहिराती पाहिजे असतील तर आमची स्तुतिच केली पाहिजे असा फर्मान् सिनेमावाल्यांनी अगोदरच सोडलेला होता, तेव्हा असें कांही होणार याची आम्हांस कल्पना होतीच, परंतु पैशाने सर्वच संपादकांचीं तोंडें बंद करतां येत नाहींत, हेंही त्यांस सांगणें जरूर होतें, आणि तें सांगणार कोण?

आम्ही आज दहा वर्षें प्रभातच्याच काय, पण जवळजवळ कोणत्याही जाहिरातीशिवायच जगलों आहोंत, आणि पुढेंही जगूं अशी आशा आहे. अर्थात् आपलें कोणीं ऐकलें नाही तर त्याला गोळी घालण्याची शक्ति हिटलरवृत्तीच्या भांडवलवाल्यांस असती तर गोष्ट वेगळी होती. पण सुदैवानें तें शक्य नाही, तेव्हा त्यांना धाब्यावर बसवण्यास सध्यां तरी हरकत नाही.

केवळ धंदा या दृष्टीने चालवलेल्या पत्रांस मात्र असें करतां येत नाही, व याचीं कांही मजेदार उदाहरणें दिसतात. दारूच्या व्यापाऱ्यांनीं जाहिराती बंद करण्याची धमकी दिल्याबरोबर इंग्लंडांतील मितपानसंस्थांचे प्रचारलेख छापण्यास कोणीही तयार होईना. नुकतेंच इंग्लंडांत घडलेलें उदाहरण म्हणजे इंग्लंडांतील दुधाच्या व्यापाऱ्यांच्या संस्थेने दुग्धपानाबद्दल मोठ्या प्रमाणावर जाहिराती देऊन प्रचार चालवला आहे. तेव्हा तेथील एका प्रमुख वैद्यकीय संस्थेस यांत धोका दिसून त्यांनी लोकहिताच्या दृष्टीने जाहिराती देण्यास सुरवात केली की सर्वच दूध चांगलें नव्हे, दुधाने अनेक भयंकर सांसर्गिक रोगांचा प्रसार होतो, तेव्हा जें दूध या दृष्टीनें जंतुरहित केलेलें असेल, तेवढेंच प्यावें. केवळ दूध म्हणून वाटेल तेथलें दूध पिवूं नये. वस्तुतः यांत त्या संस्थेचा कोणताही स्वार्थ असणें शक्य नाही व ते लोकहिताकरतां जाहिरातींचा खर्च करीत होते. परंतु दुधाच्या व्यवसायास या जाहिराती बाधक होतील, आणि वैद्यकीय संस्थेपेक्षा दुधाच्याच व्यापाऱ्यांचें महत्व पैशाच्या दृष्टीनें जास्त, असा पोक्त विचार करून लंडनमधील कांही प्रमुख वर्तमानपत्रांनी या इशाऱ्याच्या जाहिराती छापण्याचें नाकारलें, आणि अशा रीतीने डाक्तरांच्या एका जबाबदार संस्थेचें मत भांडवलशाहीने दडपून टाकलें. धंदेवाईक वर्तमानपत्रांची अशी स्थिति असतांना संपादकांनी जाहिरातदारांविरुद्ध लिहिणें शक्यच नसतें, पण येथे पहावें तर संपादकीय लेखांत देखील 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' या न्यायाने अत्यंत गचाळ बोलपटांची देखील भरमसाट स्तुति केलेली सांपडते, आणि हें आमचे मतें गैर आहे. लोकांना पाहिजे असेल तें पुरवून त्यावर पोट भरणें, हें देखील संपादकीय दृष्टीने मोठेंसें उच्च ध्येय नव्हे; परंतु

वाचकांना पाहिजे असेल तें नव्हे, तर जाहिरातदारांना पाहिजे असेल तें वाचकांच्या गळीं उतरवण्याचा प्रयत्न करणें, ही वाचकांची फसवणूक आहे. संपादकांनी इतका देखील स्वाभिमान राखला नाही तर मग लोकमत तयार करणें वगैरे नुसत्या तोंडच्या गप्पा कशाला माराव्या ? जाहिरातींच्या पानांत कांहीही असलें तरी त्याची जबाबदारी संपादकांवर येत नाही असें म्हणतां येईल, परंतु इतर पानांची मात्र निःसंशय येते, आणि तीं पानें आणि आपली लेखणी जाहिरातदारांना विकणें योग्य नव्हे.

अजब कैफियत !-४.

——:०:——

डॉ. मनोरमाबाई थत्ते यांची उसनी अक्कल आणि पुस्तकी विद्या अनुभवाच्या अभावीं कोणीकडे वहात गेली, हें मागील तीन लेखांत पाहिलें. त्यांनीं 'यशवंत'च्या फेब्रुवारीच्या अंकांत समारोपादाखल जो लेख 'स्वतःच्या अकलेचा' म्हणून जाहीर करून लिहिला आहे, त्यांत त्यांनी काय तारे तोडले आहेत तें पाहून हें कंटाळवाणें, पण नाइलाजाने लिहावें लागलेलें, परीक्षण पुरें करूं.

आम्हीं पहिल्याच लेखांत सांगितल्याप्रमाणे बुरसट सनातनी हिंदुस्थानांतच सांपडतात असें नाही, यूरोपांतही आहेतच. तेव्हा पाश्चात्यांच्या मागे जाण्याबद्दल लोकांना नांवें ठेवणाऱ्या, परंतु स्वतः पाश्चात्यांचेच आधार देणाऱ्या, डॉ. सौ. थत्त्यांना सनातनी पाश्चात्य लेखक सांपडल्यास नवल नाही. त्यांचे मतें आम्ही पाश्चात्यांचा मूर्खपणा घेतों व त्या शहाणपणा घेतात, आणि आमचें मत याच्या बरोबर उलट आहे. यांत खरें काय हें ठरवणें अर्थातच वाचकांवर राहील. हिंदुस्थानच्या लोकसंख्येसंबंधी त्यांनी प्रो. टॉमस यांचा उतारा दिला आहे. "हिंदुस्थानसारख्या देशाला ३५ कोटि लोकसंख्या मुळीच भारभूत नाहीं. याच्या दुपटीच्या लोकसंख्येचें पोषण करण्याची ताकद या भूमींत आहे ही गोष्ट विद्वानांच्या लक्षांत येत नाहीं." या गृहस्थांना म्हणे १९३७ च्या हैदराबाद

येथील 'एकॉनॉमिक् कॉन्फरन्स'चे अध्यक्ष केलें होतें! तरीदेखील यापेक्षा मूर्खपणाचें विधान सांपडणें कठिण. याविषयी पाश्चात्यांकडे न वळतां ६ फेब्रुवारीच्या 'इलस्ट्रेटेड वीकली'मधें प्रसिद्ध झालेल्या लेखांतील लखनौ युनिव्हर्सिटींतील प्रो. राधाकमल मुकर्जी यांनी लंडन येथें नुकत्याच दिलेल्या एका व्याख्यानांतील विधान पहा. ते म्हणतात कीं आजच हिंदुस्थानची लोकसंख्या येथे उत्पन्न होणाऱ्या अन्नाचे मानानें पाहिल्यास ४,८०,००,००० इतक्या संख्येने फाजील वाढली आहे, आणि हिंदुस्थानांतील शक्य तितक्या जमिनीची, अत्यंत परिश्रमानें आणि सर्व शास्त्रीय उपायांनीं शक्य तितकें अन्न काढण्याच्या दृष्टीनें, कालवे वगैरेची सार्वत्रिक योजना होऊन, लागवड झाल्यास कमाल उत्पन्न म्हणजे ४४,७०,००,००० लोकांना पुरेसें होईल, परंतु लोकसंख्येची वाढ १९५० पर्यंतच इतकी होईल. हें पाहिल्यास प्रो. टॉमस यांचा मूर्खपणा तांबडतोब लक्षांत येईल – अर्थात् केवळ उतारे देणारांच्या नव्हे, तर स्वतः विचार करणारांच्या – पुढें उत्पन्न होणाऱ्या अन्नावर आजचे लोक जगूं शकत नाहींत, ही साधी गोष्ट ज्यांच्या लक्षांत येत नाहीं, त्यांनीं इतर विद्वानांना नांवें ठेवणें म्हणजे धाष्टर्याची कमाल आहे. सध्यां हिंदुस्थानांत लोकसंख्येला पुरेसें अन्न उत्पन्न होत नाहीं, हिंदुस्थानांतील कमाल शक्य उत्पन्न घेतल्यास तें ४५ कोटींना देखील पुरेसें होणार नाहीं, हें कमाल उत्पन्न होण्यास कालवे वगैरेची शक्य तितकी वाढ झाली पाहिजे, ती १९५० पर्यंत होणें अशक्य आहे, आणि लोकसंख्या मात्र तेथपर्यंत या कमाल अन्नाच्या मर्यादेपर्यंत वाढेल. याचा अर्थ असा कीं संततिनियमनाचें अवलंबन न झाल्यास किंवा प्लेग वगैरेच्या साथी न आल्यास, किंवा त्या कृत्रिम रीतीनें न आणल्यास, उपासमार ही हिंदी लोकांच्या नशिबीं ठेवलेली आहे, आणि ती कायमची आहे. पण बाष्कळ बडबड करणारांना यांतलें काय कळेल? ते यापेक्षां जास्त काय करणार, मायभूमीची तारीफ करून ते देशभक्त म्हणवून घेणार!

डॉ. सौ. थत्त्यांनीं स्वतः विचार करण्याची शक्ति या लिखाणांत कोठेही दाखवलेली नाहीं, हें कोणालाही स्पष्ट दिसेल. उदाहरणार्थ स्त्रियांच्या इंद्रियसुखाचा

पुरस्कार करणाऱ्या या बाई लिहितात (पान ९) " अगदीं खोल अंतःकरणांत दडून बसलेला, प्रथमारंभीं सूक्ष्म दिसणारा, मायावी वासनेचा राक्षस या सर्वांनी (आर्थिक स्वातंत्र्य वगैरे गोष्टींनीं) अतृप्त राहिला, आणि वाढत्या वयाबरोबर त्यानें आपलें विराट स्वरूप प्रगट करतांच पाश्चात्य स्त्रियांनीं त्याला हतबल करण्यासाठीं अनेक कृत्रिम साधनांचा उपयोग करून स्वतःचा जीवनक्रम निराश, निरानंद करून टाकला. हार म्हणून कवटाळला तो फणींद्र निघाला." या भाषाशैलीची तारीफ करावी तितकी थोडांच ! त्यांचें म्हणणें कीं फणींद्र न कवटाळतां राक्षस कवटाळावा ! स्वतःला जी गोष्ट इष्ट वाटते तिला राक्षसी म्हणण्याची कल्पना अजब आहे ! हा विचारांचा गोंधळ होतो याचें कारण उसने विचार.

आपण आधार देतों ते बरोबर लागू पडतात की नाहीं याचीही त्यांना शुद्ध नाहीं. इंग्लंडांत मुलींच्या विवाहाचें सरासरी वय २५ आहे असें एकदां सांगितलें, तें लक्षांत न राहून त्या एका शास्त्रज्ञाचें मत देतात, " एका विशिष्ट वयाच्या, म्हणजे सुमारे २८ वर्षांच्या पुढे अविवाहित राहणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या मनोधर्माचें विवेचन फार मार्मिक तऱ्हेनें केलें आहे. त्यांच्या ठिकाणीं दिसून येणारा निरुत्साह, चिडखोरपणा, एकलकोंडेपणा, इत्यादि अनेक दुर्गुण त्यांचे ठिकाणीं त्यांनीं ओढवून घेतलेल्या ब्रह्मचर्यामुळें जडतात असें त्यांचें म्हणणें आहे ". पंचवीस व अठ्ठावीस यांत फरक आहे, तेव्हा पंचवीस हेंच वय जास्त म्हणणारांना या आधाराचा उपयोग नाहीं हें त्यांना समजत नाही !

रशियाबद्दल वाटेल त्याने वाटेल तें बोलावें असें त्यांचें मत दिसतें, कारण त्या खुःशाल ठोकून देतात की " रशियांत अस्तित्वांत येत असलेल्या सांघिक गृहांची रचना पाहिली तर त्यांत आपल्या पूर्वीच्या एकत्र कुटुंबपद्धतीपेक्षां निराळें कांहींतरी आहे असें नाहीं." जें माहीत नाही त्याबद्दल लिहूं तरी नये ! बरींच माणसें एकत्र राहिलीं किंवा जेवलीं म्हणजे एकत्रकुटुंबपद्धति होत नाही, तीं माणसें एका कुटुंबांतील असलीं तरच त्याला तसें नांव देतां येईल.

त्या म्हणतात "पाश्चात्य समाजावर कृत्रिमतेची पकड बसलेली आहे." ती बसलेली नाही कोणावर? घरें बांधणें, किंवा वस्त्रें नेसणें, हीही कृत्रिमताच आहे. वस्त्र गिरणींतील यंत्रावर काढलें कीं तें कृत्रिम आणि हातमागावर काढलें तर तें कृत्रिम नव्हे, ही फसवणूकीची भाषा गांधींच्या अमदानींत देखील खरी म्हणतां येणार नाही. ज्यांची अधिक प्रगति झाली त्यांना कृत्रिम म्हणणारे मागसलेले लोक केव्हांही सांपडणारच. नग्न स्थितींत गुहेंत राहणारा मनुष्य अगदी जहाल सनातनी आर्यस्त्रीला देखील कृत्रिमच म्हणेल, मग तिला डॉ. सौ. थत्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दीडदीड वर्षाने मूल होवो, किंवा मुळींच न होवो, आणि ती पुरुषावर अवलंबून राहो, किंवा आपलें पोट दळणकांडण करून भरो! पुढारलेल्या लोकांना मागसलेले लोक नेहमीच कृत्रिम म्हणतात, म्हणून त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष दिलें पाहिजे असें नाही, तद्वतच डॉ. सौ. थत्त्यांची ही बडबड व्यर्थ आहे. तीकडे समंजस लोकांनी लक्ष देण्याचें कारण नाही.

त्यांचा युक्तिवाद फोल आहे. त्यांनी पुरुषांना व पाश्चात्यांना नांवें ठेवूनही बऱ्याच पुरुषांचे व पाश्चात्यांचे आधार स्वतः दिले आहेत, आणि संदर्भग्रंथांची व लेखकांची यादी दिली आहे त्यांत आपल्या विरुद्ध असलेले लोकही दडपले आहेत, उदाहरणार्थ बरट्रँड व डोरा रसेल व हॅवलॉक एलिस. हें अर्थातच त्यांच्या डोक्यांतल्या गोंधळामुळे झालेलें आहे, त्या वाचकांची मुद्दाम दिशाभूल करण्याचा प्रयत्न कशा करतील? जन्ममरणाचे आंकडे, लोकसंख्या, वगैरेची बिलकूल माहिती नसतांना त्यांनी अज्ञानाने पाहिजे तशी विधानें केलीं आहेत व अवतरलीं आहेत. तीं किती हास्यास्पद आहेत हें सहज दिसण्यासारखें आहे. विशेषतः यूरोपांत हिंदुस्थानासंबंधीं बरेंच अज्ञान असतें, तेव्हा "एका प्रमुख शेतकीप्रधान देशांत लोकांना अन्नवस्त्र पुरेसें मिळत नाही" याचें त्यांना आश्चर्य वाटतें. ज्यांनी त्याचा थोडाबहुत अभ्यास केला आहे त्यांना यांत बिलकूल आश्चर्य वाटत नाही. कारण उत्पन्न कितीही असलें तरी मनुष्याची प्रजोत्पत्तीची शक्ति इतकी प्रचंड आहे, की लोकसंख्या नेहमी अन्नाचे मानाने फाजील वाढूं पाहते, आणि तेथें पाश्चात्यांच्या आधारांचा उपयोग होत नाही.

कॅन्सरसंबंधी डॉ. सौ. थत्ते यांचीं अविश्वसनीय विधानें वाचून आम्हीं लंडन येथून या विषयावर माहिती मागवली, ती पुढें देत आहोंत. ती विश्वसनीय आहे हें कोणासही दिसेल.

इंग्लंदांतिल प्रमुख वैद्यकीय पत्र जें 'लॅन्सेट,' त्याच्या ऑगस्ट ८, १९१४ च्या अंकांत पुढील विधान सांपडतें. डॉ. चार्ल्स रायल, एफ्. आर्. सी. एस., 'कॅन्सर् हॉस्पिटल्' चे सर्जन् म्हणाले की "गर्भाशयाचा कॅन्सर हा मुख्यतः मातृत्वाचा रोग आहे. हा रोग निपुत्रिकांपेक्षा आयांसच कितीतरी जास्त प्रमाणांत होतो."

पुढें दिलेली नाहिती १९२४ व:१९२६ सालच्या 'रजिस्ट्रार जनरल्स् स्टॅटिस्टिकल् रिव्ह्यू' वरून घेतली आहे.

डॉ. सौ. थत्त्यांचे मतें संततिनियमनानें **स्त्रियांना** कॅन्सर होतो, पण 'रजिस्ट्रार् जनरल्' यांनीं असें दाखवलें आहे की स्त्रिया व पुरुष या दोहोंतही कॅन्सरपासून मृत्यूंची संख्या वाढत आहे, परंतु **पुरुषांत स्त्रियांपेक्षा जास्त प्रमाणांत वाढत आहे.** त्यांचे मतें ही वाढ बऱ्याच अंशीं चिकित्सेंतील सुधारणेमुळे झाली आहे, कारण पूर्वी ज्याला कॅन्सर म्हटलें नसतें, त्याला हल्ली कॅन्सर म्हणतात. शिवाय ही वाढ विशेषतः अन्ननलिकेच्या कॅन्सरचे बाबतींत झाली आहे व संततिनियमनाच्या उपायांचा व अन्ननलिकेचा संबंध नसतो.

आतां कॅन्सरचे बाबतींत हें सर्वमान्य झालें आहे की शरीराच्या ज्या भागाला डंवचल्यामुळें किंवा अन्य कारणाने वारंवार त्रास होतो, अशाच ठिकाणीं कॅन्सर होण्याचा संभव विशेष. यावरून पाहिलें असतां संततिनियमनाच्या उपायांमुळें जर कॅन्सर झाला, तर तो विशेषतः योनिमार्ग व गर्भाशय यांतच झाला पाहिजे. परंतु आंकड्यांवरून असे दिसतें की या दोन ठिकाणचा कॅन्सर जास्त तर नाहींच, पण कमी झाला आहे; परंतु स्तन व बीजकोश यांचा कॅन्सर मात्र वाढला आहे. तेव्हा कॅन्सर कोणत्याही कारणामुळें वाढलेला असो, त्यांत संततिनियमनाचा बिलकुल संबंध येत नाहीं हें उघड होतें.

यावरून डॉ. सौ. थत्ते यांचें म्हणणें सपशेल खोटें ठरतें. कॅन्सर हा

आयांनाच विशेष होतो, तो उत्तर वयांतच विशेष होतो, आणि हल्ली आयुर्मर्यादा वाढलेली आहे, व चिकित्साही अधिक चांगली होते, व तरीदेखील गर्भाशय व योनिमार्ग यांचा कॅन्सर जास्त न होतां उलट कमी झाला आहे. यावरून संततिनियमनामुळें कॅन्सर वाढला या विधानाला तिळमात्र आधार नाही; इतकेंच नव्हे तर तें खोटें आहे असें सिद्ध होतें. आतां डॉ. सौ. थत्ते म्हणतात की इंद्रियें निकामी राहिल्यामुळे कॅन्सर होतो, परंतु याला कोणताही पुरावा नाही. निकामी राहिलेल्या भागांत रक्ताभिसरण कमी होउन तो निःशक्त होईल, बारीक होईल, निरुपयोगी होईल, परंतु त्याला कॅन्सर होईल असें कॅन्सरचा कोणताही तज्ञ म्हणत नाही. कॅन्सर झाल्या ठिकाणी पेशींची फाजील वाढ होत असते, व ती रक्ताभिसरण कमी झाल्यामुळें होणें संभवतही नाहीं. कॅन्सरच्या तज्ञांचें या बाबतींत एकमत आहे की ज्या भागाला कांही इजा होऊन तेथे वारंवार न्रास होतो अशाच ठिकाणीं कॅन्सर होतो, आणि कॅन्सर मातांनाच विशेष प्रमाणांत होतो याचेंहि कारण हेंच की प्रत्येक बाळंतपणाचे वेळीं त्यांचे गर्भाशयाला व योनिमार्गाला इजा होण्याचा संभव असतो. ब्रह्मचर्य कोणी पाळल्यास अशा लोकांचें जननेंद्रिय निरुपयोगी होईल, पण त्यामुळें कॅन्सर होणार नाही. मुलें झालेल्या स्त्रियांच्या स्तनांनाही न्रास होण्याचा संभव जास्त, आणि म्हणूनच या सर्व ठिकाणचा कॅन्सर त्यांच्यांतच जास्त सांपडतो, मुलें न झालेल्या स्त्रियांत सांपडत नाही, किंवा निदान पुष्कळच कमी सांपडतो. तेव्हा संततिनियमनाच्या उपायांनी कॅन्सर होण्याऐवजी उलट कांही प्रमाणांत कॅन्सरपासून बचाव होतो.

या असमंजस लेखमालेचा इतका विचार पुरे.

कसाई

—:×:—

(लेखक, माधवराव बागल, राजारामपुरी, कोल्हापूर)

" मी एकटीच असलें म्हणजे माझ्या मनांत विचार येतात.....कां बरें माझ्याशीं लग्न करावें त्यांनी ? असें काय पाहिलें आहे त्यांनीं माझ्यांत ? ना रूप,

ना वर्ण, ना बांधा. मी कुरूप नसलें तरी त्यांच्या रूपाला शोभण्यासारखी कोठे आहे ? इतर स्त्रियांहून मी थोडी शिकलेली आहें हे खरें, पण ते स्त्रीशिक्षणाचे फारसे भोक्ते असल्याचें मला तरी कांही दिसलें नाही. 'शिकून काय तुला नोकरी करायची आहे ?' असें म्हणतातच की ते नेहमी मला !

पैशासाठी म्हणावें तर ते गरीब असावे असें दिसत नाही. असे कपडे, असा रुबाब, अशी उधळपट्टी, हीं काय गरीबीचीं लक्षणें ? खरोखरीच का त्यांचें माझ्यावर इतकें प्रेम असेल ? पुष्कळांच्या मागण्या, ते केवळ गरीब म्हणून, बाबांनी नाकारल्या. त्यांची ठाम समजूत की प्रत्येकाचा डोळा त्यांच्या इस्टेटीवर होता. म्हणून माझ्यावर प्रेम करणारालाच मला द्यावी, ही त्यांची प्रामाणिक इच्छा. घनश्यामरावांच्याबद्दल मात्र त्यांना तशी शंका कधीही आली नाही, कारण ते श्रीमंत होते. त्यांच्या एकंदर थाटामाटावरून व वागणुकीवरून त्यांना पैशाची उणीव आहे असें कोणालाही वाटलें नसतें. जमीनजुमला वगैरेही होतें त्यांचें.

पण कां कोण जाणे, मला आपल्या भवितव्याची उगाच चिंता वाटते. त्यांच्या वागण्यांत बोलण्यांत शंका येण्याजोगें आजतरी कांही दिसत नाही खरें, पण एखादी फार चांगली गोष्ट लाभली म्हणजे ती टिकेल की नाही अशी शंका वाटणें साहजिकच आहे. किती गोड बोलतात माझ्याशीं ते ! किती प्रेम करतात, किती कळकळ दाखवतात, किती बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालतात ! बाकी भिकाऱ्याला मी हात उचलून दिलें, किंवा भुकेल्याला जेवूं घातलेलें त्यांना दिसलें, की चटकन् आठ्या पडतात त्यांच्या कपाळाला, पण माझी नजर जातांच त्या आठ्या जाऊन सहानुभूतीचे शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडतात.

माझे वडील दरिद्राचे लाखोंपति झाले, पण स्वतःच्या गरिबीला कधी विसरले नाहीत. कोणा भिकाऱ्याला पाहिलें की त्यांना पाझर फुटे. याचमुळें मलाही गरिबांविषयीं सहानुभूति वाटे. केव्हाकेव्हां मी अशा असहाय जीवांना मोटरींत घालून घरीं आणीत असे. माझा हा एक स्वभावच पडून गेला होता.

पण घनश्यामना कोणी पंगू, अंधे किंवा दरिद्री दिसले, की त्यांचा तिट-

कारा येई, आणि निव्वळ मला बरें वाटण्यासाठीं त्यांना हें लपवावें लागे. मला भवितव्याविषयीं भीति वाटण्याचें कारण हेंच. याचमुळें लग्नासंबंधीं मी चालढकल चालवली होती. चांगलें स्थळ गेलें म्हणजे दुसरें मिळणें कठिण, म्हणून बाबा मात्र अस्वस्थ होत, पण माझ्याशिवाय त्यांना कोणीच नसल्यामुळें माझ्या इच्छेविरुद्ध कांहीं करण्याचें ते मनांत आणीत नसत. आई वारल्यापासून मी म्हणजे सर्वस्व होतें त्यांचें. मुलगा नसल्यामुळें शिक्षणाची हौस त्यांनीं माझ्यावर पुरवून घेतली होती. मी कालेजांत जाऊं लागलें होतें आणि बाबांनी मला एक छोटीशी मोटर घेऊन दिली होती.

शनिवारचा दिवस. कॉलेज सुटल्यावर मी एका दुकानांत पातळें खरेदी केलीं. बाराचा सुमार झाला होता. कडकडून भूक लागली होती. मी आतां मोटरमध्ये पाय टाकणार, इतक्यांत एका भिकारणीनें माझ्यापुढे हात केला. तिचे कपडे फाटलेले होते, मळके होते. ती अगदी क्षीण दिसत होती, तरी इतर भिकाऱ्यांहून निराळी वाटत होती. तिनें चांगले दिवस पाहिले असावेत असा पाहणारास भास होई. या विचारांमुळेंच पाकिटांतून आणेली बाहेर काढायला उशीर लागला, आणि ती तिच्या हातावर ठेवणार, इतक्यांत तिला घेरी आली, आणि ती तेथेच फरशीवर बेशुद्ध पडली.

मी तिला घरीं घेऊन आलें, आणि ती शुद्धीवर झाल्यावर तिला चहा व फराळाचें दिलें. तिला हे डोंगराएवढे उपकार वाटले, आणि तिनें माझे पाय घट्ट धरून 'देव तुमचें कल्याण करील' असा आशीर्वाद दिला. देवानें कल्याण केलें कीं नाहीं कोण जाणे, एवढें मात्र खरें की तिनें सांगितलेल्या गोष्टीमुळें मी एका मोठ्या संकटांतून बचावलें.

ती ताजीतवानी झाल्यावर माझ्याजवळ कांहीं न मागतां माझी रजा घेऊं लागली. त्यामुळें तर मला तिच्याविषयीं विशेषच आदर वाटूं लागला व तिला आपल्याजवळच ठेवून घ्यावी असें वाटूं लागलें. मीं तिला सहज विचारलें, 'बाई तुला चालतां येईल का नीट, कीं घरीं पोंचतुं नेऊन ?'

तेव्हा ती अगदी केविलवाणा चेहरा करून म्हणाली, 'बाई, मला कोठलें आलें आहे घर ? रस्ता हेंच माझें घर.'

—मग, राहीनास तूं आमच्याच घरीं ? आहेच आमच्या घरीं एका बाईचें काम; तूर्त रहाच तूं आमच्याकडे, मग सांगेन काय करायचें तें.

गडीमाणूस होतें, पण तिला पाहिल्यापासून तिला आपल्याजवळ ठेवून घ्यावें असें वाटत होतें. बाबा माझ्या इच्छेआड केव्हांच येत नसत. ते बोलले तर नाहीतच, पण त्यांनी उलट सहानुभूतिच दाखवली.

नाताळची सुटी घालवण्याकरतां घनश्याम मुंबईला गेले होते, तेव्हा बाबांच्या खेरीज बोलायला कोणीच नव्हतें, म्हणून मी तिला मुद्दाम आग्रह करून ठेवून घेतली. प्रथम मी तिची हकीकत ऐकण्याची जिज्ञासा मुद्दामच दाखवली नाही, आणि कामही अगदीं जुजबी कांहीतरी सांगत असें.

एके दिवशीं सकाळीं गच्चीवर आरामखुर्चीवर वाचीत पडलें होतें, इतक्यांत यमुना चहा घेऊन आली, आणि माझें संपेपर्यंत तेथेंच उभी होती. तेव्हा मी म्हटलें, 'बैस खालीं, तिष्ठत कां उभी ?' हें ऐकून तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. मी म्हटलें, 'कां ग यमू, रडतेस कां ? तुला कसला त्रास का होतो येथें ? मन मोकळें करून बोलत जा माझ्याशीं, मालकीण समजून संकोच मानीत जाऊं नको अगदी. तुला झेपेल तेवढेंच काम करीत जा, समजलें ?'

तिला अधिकच रडूं कोसळलें. 'कांही कमी नाही मला, माझें नशीब म्हणून तुमचे पाय दिसले, नाहीतर कोठेतरी पडलें असतें मरून.'

—काय ग, तुझें कोणीच का नाही जवळचें ? तुझी अशी स्थिति कशाने झाली ?

—काय सांगूं बाई ? माझ्या दुर्दैवाची गोष्ट सांगून तुम्हांला कशाला शिणवूं ?

—जगाचीं दुःखें समजावून घ्यायचें मला तरी वेड आहे. जगांत दारिद्र्य कां असावें हेंच मला समजत नाही. पशुपक्ष्यांना सुद्धां जगतां यावें, आणि माणसांना कां बरें अन्न मिळूं नये ? गरिबी आपल्या कर्मानें आली, आळशीपणानें

वाईट दिवस आले, तर त्याबद्दल बोल लावतां येईल, पण उपजतांच कांही दरिद्री आणि कांहीं श्रीमंत, हा कोठला न्याय ? मला तर कांही सुचत नाही. तूं देखील मुळचीच दरिद्री होतीस काग ?

—श्रीमंत कधीच नव्हतें, पण आजच्यासारखी स्थिति नव्हती पूर्वी. आई गिरणींत काम करीत असे. तिचें काम हलकें करावें म्हणून 'मी सुद्धां येतें गिरणींत' म्हणून किती वेळां सांगितलें, पण प्राण गेला तरी तुला गिरणींत धाडणार नाही, असें ती निश्चयानें म्हणत असे. शीलाची चाड असलेल्या मुलींनी कड्यावरून उडी टाकून जीव द्यावा, पण गिरणींत पाय टाकूं नये, असें ती म्हणे. पण आई त्या कामाने आजारी पडली, त्यामुळे जगांतलें सुखदुःख चांगलेंच अनुभवलें मी. त्यावेळीं सुख वाटलें तें सुख नव्हतें. माझ्यापुढें डबरा खणून ठेवलाच होता, पण तो मधुर बोलाच्या फुलांनी झाकून टाकला होता.

—कोणी फसवणूक केली तुझी ?

—एका मोहक चेहऱ्याच्या सैतानानें. सुंदर पोषाखाने नटलेल्या त्या दरोडेखोराने. आठवण झाली की डोकें फिरतें. तुम्ही त्याला पाहिलें असतें तर माझ्यावर विश्वासच बसला नसता तुमचा. मलाच कांहीतरी बालंट घेणारी कुटिला ठरवली असती तुम्हीं. पण मी कुटिला नाहीतर काय ? त्या पापमार्गांत मी कां पडावें ? कारण प्रेम, वेडें प्रेम, प्रेमाच्या माणसासाठी सगळ्या जगाला लाथाडणारें प्रेम.

—लग्नाची आशा दाखवून टाकून दिली का तुला ?

—लग्नाची आशा ? छे. ते काय माझ्या बरोबरीचे होते ? त्यांनी दहा लग्नें केलीं असतीं तरी मला वाईट वाटलें नसतें. त्यांची जन्माची दासी म्हणूनच राहणार होतें मी. अगदी संकटाच्या वेळीं मला त्यांनी मदत केली. मला त्यांचे उपकार अगदी निःस्वार्थी वाटले म्हणूनच मी अगदी भाळून गेलें. आई अगदी मरणोन्मुख, तिला डाक्तराला दाखवणें भाग होतें, फीशिवाय डाक्तर हालेना, मी गळ्यांतला मण्यांचा सर टेबलावर ठेवला, पण ही उसाबर कोणी

करावी म्हणून त्यालाही त्यांनी हात लावला नाही. तेव्हा तो विकण्याकरतां मी दवाखान्यांतून बाहेर पडलें. त्याबरोबर आमचें बोलणें ऐकलेले एक गृहस्थ माझ्या मागोमाग आले. ते म्हणाले 'मीं सगळें ऐकलें आहे, तुम्ही संकटांत आहांत, हे घ्या पांच रुपये आणि द्या डाक्तरांना.' आढेवेढे घेण्याचा तो प्रसंग नव्हता. मागाहून परत करायचें ठरवून मीं ते घेतले. यानंतर ते आईची विचारपूस करायला घरीं येऊं लागले. आणि आमचें दारिद्र्य पाहून त्यांनी आणखी मदत केली. गरिबाला स्वाभिमान कसा राखतां येईल? मनांत खजील झालें, पण त्यांच्याबद्दल आदरहि दुणावला. मनानें मी त्यांची गुलाम झालें होतें. पण दुर्दैव माझें. आई त्या आजारांतून पार पडली नाही. गिरणीच्या कामानें तिचें रक्त आटलें होतें. आई वारल्यावर मी अगदी उघडी पडलें. गिरणींत जायची माझी छाती होईना, पण त्या गृहस्थांनी मला या वेळीं हात दिला. 'तुझी मी व्यवस्था करतों' असें म्हणून त्यांनी मला तेथून दुसरीकडे नेली.

छानदार छोटी बंगली होती, घरांतच चावी, न्हाणी वगैरे सर्व होतें; पलंग, मच्छरदाणी, गाद्या, गिरद्या, वगैरे सामानही भरपूर होतें, हाताखालीं गडीही कामाला होता. मला त्यांनी कसलीही कमतरता पडूं दिली नाहीं. मग मी त्यांच्या इच्छेला मान तुकवली म्हणून तुम्ही दोष द्याल का मला? तुला मी जन्मभर सुखांत ठेवीन, कधी अंतर देणार नाहीं, असें वचनही दिलें त्यांनी. माझ्यासारख्या असहाय, दरिद्री स्त्रीला आणखी तें काय पाहिजे? पैसा होता, सुख होतें, कसलीच काळजी नव्हती, आणि या सर्वांहून अधिक मोलाची गोष्ट म्हणजे त्यांचें माझ्यावर प्रेम होतें. त्यांच्या प्रेमाबद्दल शंका घ्यायला त्या वेळीं कांहींच कारण नव्हतें. प्रेमाशिवाय इतकें कोण करील? हा सगळा मानभावीपणा होता असें मीं कसें समजावें? पण हें मागाहून कळलें मला. मी त्यांच्या निव्वळ प्रेमाची भुकेली होतें, लग्नाची स्त्री होण्याची आशा मी कधींच धरली नव्हती. पोटभर भाकर, अंगभर धडुत, रहायला आसरा, आणि जिव्हाळ्याच्या माणसाचें प्रेम, एवढें झालें म्हणजे जगाचें राज्य मिळाल्यासारखें झालें आम्हाला. लग्नांतच काय आहे? लग्नाचे नवरे काय कमी बेइमान असतात?

पहिले कांही दिवस मी अगदी सुखांत होतें. कशाची चिंता नव्हती मला. कांही दिवस गेल्यावर त्यांनी माझा खर्च कमीकमी करीत आणला. गडीमाणूस कमी केलें, गोड भाषा कमीकमी होत आली, उगाच तोंड सुरू झालें. हें सगळें कां चाललें आहे, मला कांहीच कळेना. त्यांच्या इच्छेविरुद्ध मी करीतही नव्हतें कांही.

एकदा रात्रीच्या वेळीं एका श्रीमंत गृहस्थाला बरोबर घेऊन आले, आणि ...मला पुढचें सांगवत नाहीं. त्यांचें हृदय इतकें काळें असेल, वृत्ति इतकी नीच असेल...मला एवढी पोसली, गोंजारली, लाड केले, माझ्यावर प्रेम-छे, प्रेमाचें सोंग-केलें, तें केवळ मी एक पैसा मिळविण्याची वस्तु व्हावी म्हणून, माझ्या रूपाचा सौदा करण्यासाठी. डाक्तरच्या फीसाठी पांच रुपये माझ्या हातावर ठेवले, ते माझ्या दारिद्र्याचा फायदा घेऊन मला गुलाम बनवावें म्हणून.

गरिबांच्या देहाला चिरडून पैसे मिळवणारे गिरणीचे मालक, आणि माझ्या रूपावर पैसे मिळवूं इच्छिणारे माझे मालक. काय अंतर यांच्यांत ? दोन्ही कसाईच नव्हे काय ? ज्या वेळीं त्या चांडाळाने मला भलतीच आज्ञा केली, त्या घटकेला मी घरांतून होतें तशीच बाहेर पडलें. माझें प्रेम जळून खाक झालें, आणि मी वेड्यासारखी वाट फुटेल तिकडे चाललें. दोन दिवस एका देवळांत पडलें, अन्नपाण्याला शिवलें नाहीं. भीक मागायची संवय नव्हती, पण किती वेळ टिकाव धरणार असा ? जीव अगदी कासावीस झाला, पण पुरुषजातीपुढे हात पसरावासा वाटेना. अशा वेळीं तुम्ही दिसलां.

हें वाक्य पुरें होतें न होतें तोंच तिची नजर खाली रस्त्यावर गेली, आणि तिचें भान सुटून तिने एकदम पुढे होऊन मला हात धरून ओढलें आणि ती ओरडली , ' बाई, बाई, तो पहा, तोच तो राक्षस, माझ्या रूपाचा सौदा करून पैसे मिळवूं पाहाणारा कसाई ! '

तिला राग सहन झाला नाही, ती बेशुद्ध पडली. "

ती व्यक्ति घरांत आली, त्याबरोबर तिनें त्याला विचारलें, ' घनश्याम, ओळखते का ही बाई कोण आहे ती ?

—कसें ओळखणार मला ? गांवांतल्या साऱ्या स्त्रिया का माझ्या ओळखीच्या आहेत ?

—अस्सें ! तुम्हाला माहीत नसेल, पण मला आहे माहीत. जा, आल्या पावलीं परत जा, आणि पुनः या घराचा उंबरा ओलांडूं नका. तुम्हीं टाकलेल्या स्त्रीचें संरक्षण करायला मी भरपूर समर्थ आहें.

नूतनसंभोग आणि 'ब्लड् प्रेशर'

—:०:—

शोधक, गजानन रघुनाथ मुळे, करजत

लेखाचा मथळा वाचून वाचकवर्ग आश्चर्यचकित होईल. पण 'समाजस्वास्थ्या' च्या वाचकांना आश्चर्य वाटण्यासारखें त्यांत वास्तविक वैशिष्ट्य कांहींच नाही. नूतनसंभोग हा शब्द मुद्दाम वापरला आहे, आणि ' ब्लड् प्रेशर ' ऐवजी ' रक्ताचा दाब ' म्हणतां आलें असतें, पण तोही शब्द मुद्दामच वापरलेला आहे.

' ब्लड् प्रेशर ' हा रोग कसा, कां व केव्हां होतो, याची चिकित्सा करण्याचा या लेखाचा मुख्य हेतु नाहीं. या लेखाच्या द्वारें आमचा एक नवीन शोध व मिळवलेला थोडासा अनुभव वाचकांपुढें मांडून त्यांतून एखादा चिकित्सक अगर संशोधक या कार्यांत गुंतला आणि यशस्वी झाला, तर या रोगानें त्रस्त झालेल्या लोकांवर उपकारच होतील. म्हणून या अल्प शोधाची वाच्यता करीत आहें.

आमच्या या चिकित्सक शोधाचें मूळ म्हणजे यौवनावस्थेंत नुकताच प्रवेश करणाऱ्या १५–१६ वर्षांच्या बालिकेशीं विवाह करण्याला वृद्धांना मनूची परवानगी. मनु खरोखरच इतका मूर्ख होता का ? एखाद्या साठ वर्षांच्या वृद्धाने १५–१६ वर्षांच्या बालसंज्ञक कुमारिकेशीं लग्न लावावें, आणि त्याला मनूची

परवानगी ! काय हा सामाजिक अत्याचार ! हा एक बलात्कार नाही तर काय ? असें म्हणू समाजशास्त्राच्या ज्ञानाचा मक्ता सर्वस्वी आपणाकडेच आहे अशी स्वतःची भ्रामक समजूत करून घेणारे कांहीं घमेंडखोर लोक मनूला मूर्खच म्हणतील !

अशा या समाजशास्त्रज्ञ दर्दुरांच्या डरांवाला न भितां, 'मनु खरोखरच वृद्धांना अशा लग्नांची परवानगी देणारा मूर्ख होता काय ?' या प्रश्नाचें उत्तर खोल व सूक्ष्म चिकित्सक 'नाही' असें देऊन न थांबतां, मनूने अशी परवानगी देण्यांत समाजाचें स्वास्थ्य राखण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे, आणि त्याला कायद्याचें स्वरूपही देऊन टाकलें आहे, आणि असें करण्यांत मनूने शहाणपणाच केलेला आहे असेंच सांगेल.

वृद्धपणाचीं चिन्हें होऊं लागलीं म्हणजे कांहीं जणांना 'ब्लड् प्रेशरचा' रोग होतो. अलीकडे चाळिशीलाच वृद्धपणाची छटा दिसूं लागते. वास्तविक ५० ते ६० वयापर्यंत तरुण-प्रौढ अशीच अवस्था असून नंतर पुढे वृद्धावस्थेला सुरवात होते. ही मर्यादा कोणतीही धरा, एवढें मात्र निश्चित, की वृद्धपणांत रक्तदाबाचा रोग बळावतो. या रोगावर उत्तम उपाय कोणता ? तर नूतनसंभोग हा उपाय. रोगावर उपाय केले म्हणजे सर्व रोगी बरे होतात असा अनुभव कोठेच येत नाही, म्हणून उपाय करूं नये असें कोणी म्हणत नाही. रोग आणि उपाय हे सहचरच आहेत.

महाभारतांत असें एक वचन मिळालें की, 'हे राजा, तूं आतां तुझ्या या नूतन राणीला आपल्या बाणाने विद्ध कर, म्हणजे हृदयस्थ असलेल्या रोगापासून मुक्त होशील. याचा अर्थ अर्थातच लाक्षणिक आहे. रक्तदाबाचा रोग हृदयस्थ असतो. संभोगाला अगदींच अपरिचित असलेल्या नूतन बाला-तरुण स्त्रीशी संभोगाप्रीत्यर्थ ज्या कांही विशिष्ट शृंगारिक चेष्टा होत असतात, त्यांनी युक्त अशा संभोगाने रक्तदाबाचा रोग कमीकमी होत जातो. संभोगाशी परिचित असलेल्या तरुणीशी या विशिष्ट चेष्टा होत नाहीत, संभोगाला अपरिचित असलेल्या तरुणीशीच होतात, आणि अशा प्रकारचा संभोग हा ब्लडप्रेशरचा रोग नाहीसा करण्यास

उत्तम उपाय आहे, अशी वैद्यकशास्त्रदृष्ट्या मनूची खात्री झाली होती. म्हणून त्या उपायाला कायदेशीर स्वरूप देण्यासाठीं वृद्ध–तरुणी विवाहाला मनूने परवानगी दिली. तरुण पुरुषाने वृद्ध स्त्रीशीं संभोग केल्यास त्या तरुणाला लवकरच वृद्धत्व येतें, पण त्या वृद्धेला तारुण्य येतें. त्याचप्रमाणे वृद्ध मनुष्याने बालातरुणीशी संभोग केल्यास तो वृद्ध तरुण बनतो, परंतु ती तरुणी मात्र वृद्ध होत नाही, उदासीन मात्र होते. पुढेपुढे परिचयाने ही उदासीनताही नष्ट होते.

रक्तदाबावर हा नूतन संभोगाचा उपाय करण्यासाठी आपल्या शक्तिसाम, र्थ्याचा दुरुपयोग एखाद्या बलिष्ठाने करूं नये, आणि बळजबरीचा आरोप येऊं नये-म्हणून विवाहाचा हा कायदेशीर उपाय मनूने दाखवलेला आहे, पण तो केवळ या रोगांतून मुक्त होण्याची इच्छा करणाऱ्या वृद्धासाठी. वृद्ध मनुष्य तरुणीची कामशांति कशी करणार, हें काय मनूला माहीत नाही? पण 'ब्लड् प्रेशर' त्याच्या समोर आहे ना?

नवतरुणीशीं प्रथमसंभोगाचे वेळीं होणाऱ्या या विशिष्ट चेष्टा काय असतात याचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे, परंतु या विशिष्ट चेष्टांनी युक्त अशा नूतन संभोगाने हृदय हृष्ट होतें, व त्यामुळे चित्ताला एक प्रकारची विलक्षण प्रसन्नता येते. या विशिष्ट प्रसन्नतेने रक्ताचा दाब कमीकमी होऊन रक्तदाबामुळे नष्ट झालेली निद्रा प्राप्त होऊन या निद्रासुखामुळें रक्तदाबाचा रोग क्रमाक्रमाने नष्ट होतो. संभोगानंतर आंवळ्याच्या अंगरसाने मिश्रित, शुद्ध तिळाच्या तेलाने मस्तक व सर्व शरीर यांचें मर्दन करून, सोसेल इतक्या गरम पाण्याने स्नान करावें नंतर तापवलेलें गाईचें दूध, चवीपुरती थोडीशी साखर घालून प्यावें. या उपायाने फारच उत्तम निद्रा लागून संभोगापासून अशक्तता येत असेल तर तीही येणार नाही. वाचकांनीं याचा अनुभव जरूर घ्यावा.

रक्तदाबावरील या उपायाबद्दल मुंबईचे सुप्रसिद्ध आयुर्वेदतीर्थ आप्पाशास्त्री साठे यांच्याजवळ मी बोलत असतां त्यांनी सांगितलें की हा उपाय त्यांना माहीत असून त्यांनी आपल्या एका गुजराथी रोग्याची प्रकृति तपासून त्याला हा सल्ला दिला असतां त्या रोग्याने एक १६ ते १८ वर्षांची बालासंज्ञक तरुणी रखेली

म्हणून ठेवली आणि तो रोगमुक्त झाला. ज्या रोग्याला हा सल्ला द्यायचा, त्याला तो कितपत मानवेल याचा विचार होण्यासाठी त्याचें प्रकृतिमान तपासलें पाहिजे.

हा उपाय जरी नवीन आणि विचित्र वाटत असला तरी आयुर्वेदाचें पारंपरिक ज्ञान असणाऱ्या आयुर्वेदतीर्थांना हा उपाय माहीत असतो आणि या उपायाचा ते गाजावाजा न करतां रोग्यांना रोगमुक्त करीत असतात. या उपायाचा मी स्फोट करीत असल्यामुळे तो नवीन वाटतो. वास्तविक हा उपाय आजकालचा नसून हजारों वर्षांचा जुना आहे. ही उपाययोजना करण्यांत कोणताही दोष राहूं नये म्हणून अशा प्रकारच्या विवाहाला अधर्म्य (बेकायदेशीर) न मानतां धर्मशास्त्रांत (कायद्यांत) त्याची सोय करून ठेवली. असें करण्यांत मनूने मूर्खपणा केलेला नसून खोल विचारांतीं तो शहाणपणाच होय असें आढळून येतें. त्यांतील रहस्यज्ञान आपणांस समजलें नाही तरी मनु मूर्ख ठरत नाही.

[वरील लेख कांही अंशीं 'विनोदी लेख' म्हणूनच आम्हीं छापला आहे. हा केवळ मनूची वकिली करण्याचा प्रयत्न आहे. मनूने रक्तदाबाचा उल्लेख केलेला नाही आणि मनूचा खरोखरच तसा उद्देश असता तर फक्त रक्तदाब असलेल्या वृद्धांनाच परवानगी आहे, असें म्हणणें त्याला कठिण नव्हतें. पण वस्तुतः ही युक्ति श्री. मुळ्यांच्या डोक्यांतली आहे, मनूच्या नाही. शिवाय तरुण बायको केली म्हणून ती संभोगाशीं अपरिचित अशी किती दिवस राहणार ? तरुणीशीं संभोगाने वृद्धांचा थोडाबहुत फायदा होतो (अतिरेकाविषयी विशेष काळजी घेतल्यास) यांत शंका नाही. परंतु ती कुमारीच पाहिजे असें नाही, आणि त्यांनी जें उदाहरण दिलें आहे त्यांत लग्न करण्याऐवजी रखेली ठेवली असें सांगितलें आहे. कुमारिकेशीं होणाऱ्या विशिष्ट चेष्टांनी वृद्धांस कांही विशेष फायदा होतो, ही एक वकिली थाप आहे. तरुणाने वृद्धेशीं संभोग केल्यास त्याचें नुकसान होतें आणि त्याउलट झाल्यास तरुणीचें तितकें नुकसान होत नाही, ही दुसरी एक थाप आहे. कांही असलें तरी अशा प्रकारचें लग्न करण्यांत तरुणीचा–निदान प्रकृतीच्या दृष्टीने–कोणताही फायदा नाही. असें लग्न फक्त वृद्धाच्याच फायद्याचें होईल. रखेली खुशीने राहते, तशीच पैशाच्या आशेने एखादी तरुणी लग्नालाही तयार

होईल, तर तो तिचा प्रश्न आहे. पण मग रखेलीच काय वाईट ? तीही कायदेशरिच असते. श्री मुळे म्हणतात, मनूसमोर 'ब्लड् प्रेशर' होतें. अर्थात् तो स्वतः वृद्ध झाल्यामुळे त्याला ही युक्ति सुचली असेल, आणि या दृष्टीने त्याला मूर्ख मुळीच म्हणतां येणार नाही. त्याला अट्टल सोदा म्हणावें लागेल इतकेंच. **संपादक.**]

पत्रव्यवहार

१

१. अलीकडे आपल्या मासिकांत श्री. 'अभिसारक' यांचे लेख प्रसिद्ध होत असतात. ते विचारणीय असतात यांत शंका नाहीं, पण तरीदेखील त्यांत कांहीं चुकीची विधानें आलीं आहेत. जानेवारीच्या अंकांत त्यांनीं पृष्ठ २२१ वर भाषांतराशिवाय फक्त संस्कृतमध्यें प्रसिद्ध झालेल्या कांहीं पुस्तकांची यादी दिली आहे, ती सपशेल चूक आहे. कारण त्यांपैकीं 'पंचसायक' व 'नागरसर्वस्व' हीं वेंकटेश्वर छापखान्यानेच हिंदी भाषांतरासह प्रसिद्ध केलीं आहेत. शिवाय 'रतिरहस्य' हें पुस्तक देखील भाषांतरासह त्यांजकडे मिळूं शकतें असें चौकशीअंतीं समजतें. 'रतिमंजरी' हें छोटें पुस्तक हिंदी भाषांतरासह बनारसचे मास्तर खेलाडीलाल यांनीं प्रसिद्ध केलें आहे. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील लेखांबाबत वाचकांची (निदान माझी तरी) अशी खात्री असते की ते लेख सत्य व आजतागायत माहितीने भरलेले असतात. हा विश्वास श्री. 'अभिसारक' यांसारख्या अभ्यासू वृत्तीच्या लेखकाच्या लेखाने डळमळूं लागावा हें योग्य नाहीं. तरी ते यापुढें जास्त काळजी घेतील अशी आशा आहे...त्यांनी 'कामसूत्र' हा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे असेंही लिहिलें आहे. तो ग्रंथ प्रसिद्ध होऊन तब्बल साडेतीन वर्षें लोटलीं आहेत...या लेखामुळें मनांत उद्भवलेल्या एका शंकेचें समाधान आपण कराल काय ? त्यांनीं नमूद केलेली पुस्तकें वाचल्यास ज्ञान प्राप्त

होईल असें त्यांचें म्हणणें दिसतें. जयदेवाचें पुस्तक सोडून इतर सर्व कामशास्त्रावरील प्राचीन ग्रंथ आहेत. ते वाचून कदाचित् कामकलेचें ज्ञान होईल, पण कामशास्त्राचे बाबतींत मात्र त्या काळीं अज्ञान केवढें होतें याचेंच ज्ञान होईल. तसेंच जयदेवाचें पुस्तक वाचून काव्यानंद लाभेल, पण ज्ञान कसलें होणार ? त्यांत उत्कट शृंगार रस असल्यामुळेंच जर कामशास्त्राचें ज्ञान होईल असें म्हणायचें असेल, तर एखाद्या कादंबरींत बुद्धिबळांच्या ऐखाद्या डावाची चर्चा आली की ती कादंबरी बुद्धिबळांसंबंधी उत्कृष्ट आधारग्रंथ मानावी लागेल. लेख अश्लीलतेसंबंधी आहे, ' अभिसार ' गोष्टींत काहूर उठवण्यासारखें कांही नाही, संस्कृतांत किंवा इंग्रजींत त्या जातीच्याच, पण कलेच्या दृष्टीने कितीतरीपट श्रेष्ठ अशा गोष्टी आहेत, असें सांगण्याचा उद्देश दिसतो, पण प्रतिपक्षाने (त्यांचा पक्ष नुसता लंगडाच नसून ढोंगीही पण आहे हें मी जाणतों) जर असें म्हटलें की तीं सर्व पुस्तकें नीतीच्या दृष्टीने वाईट आहेत, तर ? ' अभिसार ' गोष्टीसारखे उतारे दाखवणें हें उत्तर नव्हे, खंडन तर नव्हेच नव्हे, अश्लीलता ही गोष्टच अस्तित्वांत नाही, असें प्रतिपक्षीयांस दाखवलें पाहिजे (तें काम आपण अत्यंत उत्कृष्ट रीतीनें केलेंच आहे). श्री. ' अभिसारक ' यांनीं अंगिकारालेली पद्धत तर्कशुद्ध आहे काय ? आपला ' **ज्ञानेच्छु** '.

उ. श्री. ' अभिसारक ' यांची माहिती आजतागायत नसण्याचा संभव आहे. ते मुंबईपासून बरेच लांब राहतात, तेव्हा हा विशेष मोठा दोष म्हणतां येणार नाही. तथापि आपण त्यांच्या चुका दुरुस्त केल्या हें ठीकच आहे. प्राचीन पुस्तकांतून मिळणाऱ्या ज्ञानासंबंधी आपण म्हणतां त्यांत बरेंच तथ्य आहे, परंतु 'ज्ञान' हा शब्द बऱ्याच व्यापक अर्थाने वापरण्यास हरकत असूं नये. कलेचें ज्ञानही ज्ञानच आहे आणि कामशास्त्रावरील प्राचीन ग्रंथांत चुका असल्या तरी खऱ्या गोष्टीही पुष्कळ आहेत. प्राचीन लिखाण प्रमाण मानण्याची वृत्ति नसली तर त्यांत बरेंच ज्ञान सांपडेल. अर्थात् ज्ञानाचे दृष्टीने अर्वाचीन पुस्तकें वाचणेंच अधिक बरें, हें खरें. अश्लीलतेसंबंधी तर्कशास्त्रदृष्ट्या आपलें म्हणणें योग्य आहे, परंतु लोक अश्लील कशाला म्हणतात तें पाहिलें तर असें दिसतें कीं परिचयाच्या गोष्टींना लोक

अश्लील मानीत नाहीत. उदाहरणार्थ हिंदुस्थानांत उच्च वर्गातील स्त्रिया स्तन उघडे टाकून रस्त्याने जात नाहीत व बहुतेक ठिकाणीं घरींही उघडे टाकीत नाहींत. तथापि हिंदुस्थानांतही कांही ठिकाणीं घरीं स्तन उघडे ठेवतात व बाहेर जातांना मात्र वर पातळ आच्छादन असतें. जाव्हा बेटांत गेल्यास तेथे ते बाहेर जातांनाही झांकीत नाहीत. अशीं उदाहरणें दिसलीं असतां अश्लीलता ही केवळ सांकेतिक कल्पना आहे, यापेक्षा जास्त तथ्य त्यांत नाही, हें समजण्यास मदत होते. त्याचप्रमाणें नीतीची गोष्ट. 'अभिसार' गोष्टींत फक्त नतीचाच संबंध आहे, त्यांत कांही अश्लील आहे असें प्रामाणिक सनातनी देखील म्हणणार नाहीत. त्यांत सांकेतिक अनीति आहे, परंतु दुसऱ्याचें नुकसान करणें हीच अनीतीची सर्वमान्य व्याख्या आहे. तथापि बहुतेक लोक सांकेतिक व्याख्याच धरतात, म्हणजे रूढि असेल तींच नीति, आणि त्याव्यतिरिक्त अनीति म्हणतात. समंजस लोकांनी असें म्हणतां नये. **सं.**

२

१. स्त्रीपुरुषांच्या गुह्येंद्रियाजवळील केश काढून टाकणें इष्ट आहे काय ? कांहींच्या मतें केशांमुळे संभोगसमयीं विशिष्ट विद्युत् निर्माण होऊन समागम विशेष सुखावह होतो. यांत कितपत सत्य आहे ? २. कोणत्या आसनांनी संभोग अधिक सुखप्रद होतो ? ३. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही स्वप्नावस्थेचा अनुभव येणें शक्य आहे काय ? व असल्यास पुरुषांप्रमाणे त्यांचेंही या वेळीं रेतपतन होतें काय ? ४. शीघ्रपतनावर कोणता उपाय योजला असतां पुरुषांस संभोगसुख जास्त वेळ घेतां येईल ? किर्लोस्करच्या ताज्या फेब्रुवारीच्या अंकांत आलेली 'नवजीवन' दवाखान्याची जाहिरात 'जवानमर्द पिल्स्', 'कामशक्ति नवजीवन' 'बंधेज चूर्ण' वगैरे उपाय सुचवते. यावर आपलें अधिकृत मत काय आहे ? ५ संततिनियमनाकरतां आपण शिफारसलेल्या राइट वड्यापेक्षां 'स्पेटन् पिल्स'चा उपयोग करणें जास्त खात्रीलायक व निरुपद्रवी असतें असें कांहीं डाक्टर सांगतात. त्यावर आपलें प्रामाणिक मत काय आहे ?...

उ. १. हें मत आम्हींही ऐकलें आहे, परंतु त्यांत विशेष तथ्य आहे असें वाटत नाही. सौंदर्याचे दृष्टीने ते केस राहूं द्यावे असें कांही म्हणतात, परंतु हें सर्वच केसांसंबंधी म्हणतां येईल. मिशा सुंदर दिसतात असें मत पूर्वी असे व अजूनही कांहींचें आहे, तथापि मिशा काढण्याची प्रथा रूढ होत आहे. हा वैयक्तिक प्रश्न आहे. २. 'आधुनिक कामशास्त्र' हें पुस्तक पहा. ३. स्त्रियांनाही स्वप्नावस्था होते, व हें भवभूतीच्या 'मालतीमाधव' नाटकांत सूचित केलें आहे. अशा वेळीं एक प्रकारचा स्राव होतो, परंतु स्त्रियांचे बाबतींत त्याला 'रेत' म्हणत नाहीत. 'आधुनिक कामशास्त्र' पहा. ४. औषधांच्या नांवावरून त्यांतील घटक कळत नाहीत, तेव्हा त्यांवर अधिकृत मत देणें शक्य नाही. यावर सर्वांस हमखास लागू पडेल असें औषध सांगणें अशक्य आहे. ५. डाक्टरांस या बाबतींत आमचेपेक्षा जास्त कळत नाही. वड्या कधी कधी विरघळत नाहीत, ही कांहींची तक्रार बाजारांतील सर्व वड्यांबद्दल असते व त्याचें कारण बहुधा योनिमार्गांत पुरेसा ओलावा नसणें हें असतें. अशा स्त्रियांनी वड्या न वापरतां जेली वापरावी. आमच्या वड्या स्पेटनप्रमाणें जर्मनींत बनवलेल्या असूनही अधिक स्वस्त आहेत, व अगदी आजतागायत ज्ञानावर आधारून आम्ही दिलेल्या यादीबरहुकूम केलेल्या आहेत. तेव्हा त्या सर्व वड्यांत चांगल्या असें आमचें म्हणणें आहे. आम्हास बऱ्याच वेळां डाक्टरांचे विरुद्ध लिहिण्याचा प्रसंग आल्यामुळे कांही डाक्टर साहजिकच आमचे विरुद्ध असतात. यामुळे ते तसें सांगत असतील. यापेक्षा त्यांत अधिक तथ्य नाही. 'स्पेटन' वड्या वाईट आहेत असें आमचें म्हणणें नाही, तथापि आमच्या अधिक चांगल्या व निदान अधिक स्वस्त आहेत. **सं.**

२. 'सिद्ध क्लिनिक', कोल्हापूर.

कृ. सा. न. वि. वि. आमच्या क्लिनिकचे ऑ. सेक्रेटरी मि. राजाज्ञ आपल्याला मुंबईला भेटतील. त्यांना पाहिजे असलेली माहिती आपण पुरवालच. आपण ५–६ लोकांना आमचा पत्ता सांगितला. त्याप्रमाणें त्यांचीं पत्रें आमचेकडे आलीं. त्यांना पाहिजे असलेली माहिती आम्हीं कळवली, परंतु त्यांचेपैकी

अद्याप ऑपरेशनला कोणी आलेलें नाहीत. आम्ही अजूनपर्यंत येथे १४ 'व्हॅसेक्टमी' ऑपरेशन्स् केलीं. पैकी ५–६ लोक बाहेरगांवचे होते. सर्वांनी आपआपले रिझल्ट्स् चांगले दिले. बर्थ् कंट्रोलची साधनें मात्र अद्याप ठेवलेलीं नाहीत. क्रमाक्रमानें ठेवण्याचा विचार आहे. क. लो. अ. ही. वि. आ. व्ही. **जी. गोगटे,** एल्. सी. पी. एस्.

उ. ज्यांना कायमची संतति बंद करणें असेल त्यांना शस्त्रक्रियेसारखा दुसरा मार्ग नाहीं, हें आम्ही सर्वांस सांगतोंच. शस्त्रक्रियेनें नपुंसकत्व येत नाहीं, व समागमाची इच्छाही कमी होत नाहीं, असा अनुभव पुष्कळांस आलेला आहे, आणि याउलट अनुभव कोणासही आलेला नाही. तथापि पुष्कळांस नपुंसक होण्याची भीति वाटते, तेव्हा हें जितक्या वेळां सांगावें तितकें थोडेंच आहे. शस्त्रक्रिया सर्व दृष्टींनी सोयीची आहे. हा उपाय फसण्याची भीति नाही, आणि यापासून कोणतेंही नुकसान होत नाहीं, व पुढे कोणतीही काळजी घ्यावी लागत नाहीं. कोल्हापूर येथील 'सिद्ध क्लिनिक्'मध्यें ही शस्त्रक्रिया फुकट होते, तेव्हा खर्चाचाही प्रश्न नाहीं. लोकांचा निष्कारण घाबरटपणा ही एकच अडचण आहे. प्रथम प्रयोग म्हणून शस्त्रक्रिया करायची असती तर घाबरटपणांत कांहीं अर्थ होता, आतां धैर्याचा अभाव एवढाच अर्थ होतो. **सं.**

४

घोटाळ्याचा त्रिकोण. चाळीस वर्षांमागें 'मार्त' नांवाच्या सुंदर मुलीला 'रेन्यिए' व 'दाव्हू' नांवाच्या दोघांनीं मागणी घातली. मार्तनें रेन्यिएबरोबर लग्न केलें. या तरुण जोडप्याला गरिबींत दिवस काढावे लागल्यामुळें दाव्हूबरोबर स्नेह कायम राहिला, व धंद्याच्या कारणानें रेन्यिएला बरेच महिने घराबाहेर रहावें लागे, म्हणून त्याने दाव्हूबरोबर करार केला की वर्षातून चार महिने त्याने रेन्यिएच्या सर्व घराचा (बायकोसह) ताबा घ्यावा व घरचा सर्व खर्च त्या मुदतींत चालवावा व आपल्या मृत्युपत्रांत त्या बाईला एक ठरींव रकम दरसाल मिळेल अशी तरतूद करावी. असाच करार रेन्यिएने दाव्हूला न कळ-

वतां दुसऱ्या एका गृहस्थाबरोबर केला होता. ही गोष्ट पुढे दाव्हूला समजल्यावर त्याने पुरवणी–करार करून रेन्यिएच्या बायकोच्या भोगवट्यांत त्या तिसऱ्या माणसाचा हक्क कबूल केला. बाईचा कायदेशीर नवरा व हा तिसरा इसम असे मरण पावले. तेव्हा त्यांनी करारापमाणे मार्तल्या वार्षिक रकम मिळेल अशी तजवीज केली. अखेर दाव्हूही मेला. त्याने करारापमाणे आपल्या इच्छापत्रांत तिच्या वर्षासनाची तरतूद केली आहे. परंतु असला अनीतिवर्धक करार कायद्याप्रमाणे मान्य करतां येत नाही, सबब तो रद्द व्हावा, अशी दाव्हूच्या वारसांची तकरार आहे. आपसांत तडजोड न झाल्यामुळे आता त्या विधवेने फ्रान्सच्या कोर्टांत दावा लावला आहे. दाव्याच्या अर्जांत तिने ही सर्व हकीकत नमूद केली असून हा करार इतर करारांप्रमाणेच बंधनकारक आहे असें तिचें म्हणणें आहे. हा करार बाई व तिचा नवरा व दोन उपपति अशा चौघांनी केला होता. बाईच्या नवऱ्याने आपल्या नवरेपणांत दुसऱ्या दोघांस तिच्या संमतीने पातीदार केलें होतें. हा करार कायदेशीर आहे की नाही हा निर्णयाचा मुद्दा आहे. **भास्करराव जाधव.**

उ. याचा निर्णय काय होणार याबद्दल आम्हास फारशी शंका नाही. फ्रान्सभध्येही हा करार अनीतीचाच समजतील व तो रद्द होईल. तिने नबऱ्याच्या संमतीने शरीरविक्रय केला. जेथे सर्वांची संमति आहे, तेथे कराराला मोठीशी हरकत नाही. परंतु तिची व्यवस्था विम्याच्या स्वरूपांत सहज करतां आली असती. तिला रकमच आगाऊ दिली असती तर ती कदाचित् रकम घेऊन पळून गेली असती अशी भीति होती! संभोगाचा मोबदला स्त्रीला मिळाला पाहिजे अशी जेथे कल्पना आहे तेथे असे घोटाळे झाल्यास नवल नाही. करार करतांनाच वर्षासनाची कायम व्यवस्थाही करतां आली असती. **सं.**

शारदेचें पत्र

—:०:—

स्त्रियांना सार्वजनिक अधिकाराच्या जागा द्याव्या कीं नाही, या विषयावर परवां अलाहाबादला मोठी चर्चा झाली म्हणे, आणिं 'सी. वाय. चिंतामणि'ना अध्यक्ष केलें होतें. त्यांची हकीगत सेंटिनलमध्यें आली आहे. त्याला चर्चा कां म्हणावी हें एक गूढच आहे. बोलणारांत एकच बाई होती, ती बायकांच्या बाजूने बोलली, आणि अध्यक्षांसकट बाकी सगळे पुरुष नेहमीच्या पुरुषी थाटाने बोलले. म्हणजे चूल व मूल हेंच बायकांचें योग्य काम, त्यांनी इतर भानगडींत फारसें पडतां नये. पुरुष यापेक्षा वेगळें काय सांगणार ? या दोन कटकटी तुम्ही संभाळा, आणि आम्हाला चैन करायला मोकळे सोडा. त्यांतले अगदीच रानटी असतात ते म्हणतात, बायकांना यापलीकडे कांही यायचेंच नाहीं; थोडेबहुत बरे असतात ते म्हणतात, बायकांनी हें अत्यंत उच्च दर्जाचें काम न केलें तर समाज कसा चालेल ? म्हणजे कांहींचा मार्ग शिव्या द्यायचा आणि कांहींचा हरभऱ्याच्या झाडावर चढवायचा. पण दोहोंचा सारांश एकच, की चूल आणि मूल तुम्ही संभाळा, मग तुम्हाला पाहिजे तर देवी म्हणूं किंवा गृहिणी म्हणूं. अर्थात् देवी म्हणण्याला कांही अर्थच नसतो, आणि गृहिणी हें नांव याच चोरांनी बनवलेलें आहे, कारण बायकांनीं सदैव घरांत राहिलें पाहिजे ही इच्छा ! कारण आम्हीही बाहेर जाउं लागलों म्हणजे पुरुष बाहेर काय करतात तें आम्हाला दिसेल ना ! मग वाटेल ते वेडेचार कसे करतां येतील ?

चिंतामणीसारखा मनुष्य देखील पहावा तों शेवटीं आपला पुरुष तो पुरुषच ! साहजिकच आहे, असलेले हक्क कोणीही झाला तरी खुषीने कसा सोडील ? पण एकाही शहाण्याला असें समजलें नाही की मुलें बायकांनाही हवीं असतात, आणि तीं पुरुषांना व्हावीं असें कांही त्या अजून म्हणूं लागल्या नाहीत. प्रकृतीच्या दृष्टीने मुलें अंगावर पाजलीं पाहिजेत, हेही

त्यांना समजतें. पण तरी देखील त्यांचें सगळें आयुष्य त्यांत जाणें जरूर नसतें. प्रत्येक मुलाला नऊ महिने अंगावर पाजावें लागलें, तर दोनतीन मुलांना मिळून सवादोन वर्षे त्यांत गेलीं. मुलें थोडीं मोठीं झालीं म्हणजे शाळेंत जाऊं लागतात आणि नंतर त्यांच्याकरतां फारसा वेळ खर्च करावा लागत नाही. तेव्हा यांत सगळें आयुष्य घालावें लागत नाही. जेवणाच्या बाबतींत मात्र पुरुष अत्यंत स्वार्थी असतात, यामुळे बायकांनी नेहमी आपल्या तैनातीला हजर राहिलें पाहिजे, असे ते म्हणतात. बायकांचें आयुष्य फुकट जायचें हें मुख्य कारण आहे. हा विषय सर्वांनी मनावर घेण्यासारखा आहे आणि सार्वजनिक जेवणाची व्यवस्था जशी मोठ्या शहरांत असते, तशी सर्वत्र करण्याची कांही योजना आंखली पाहिजे, तरच बायकांची सुटका होईल. अर्थात् स्वातंत्र्य कधी मागून मिळत नसतें, तें घ्यावें लागतें, किंवा तें घ्यायची ताकत आली म्हणजे तें आपोआप देखील मिळतें या बाबतींत पुरुषांनीं आपला स्वार्थ सोडला पाहिजे, पण ते खुसतें सांगून सोडणार नाहीत !

अर्थात् दोनतीनपेक्षा जास्त मुलें होऊं नयेत, याकरता संततिनियमनाची माहिती बायकांना झाली पाहिजे, आणि हें बायकांनीच मनावर घेतलें पाहिजे. जरूर पडली तर गर्भपात देखील करण्याची सोय पाहिजे, आणि असे कायदे करणें अशक्य नाही. हल्लीची सनातनी पिढी संपली की तें करतां येईल, पण बायकांनी हें लक्षांत ठेवलें पाहिजे की स्वतःच्या अंगांत ताकद, म्हणजे पोट भरण्याची शक्ति, आणल्याशिवाय केवळ पुरुषांजवळ मागून स्वातंत्र्य कधींही मिळणार नाहीं. स्वातंत्र्य मागून मिळत असतें, तर आजला हिंदुस्थानला स्वराज्य नसतें का मिळालें ? पण अजून आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे हें देखील पुष्कळ बायकांना कळूं लागलें नाहीं, आणि ज्यांना कळतें त्यांना देखील तसें सांगायची ताकत नसते. पण ज्यांना स्वातंत्र्य घेतां येईल त्यांनीं तें घेणें जरूर आहे, कारण कोकजे शास्त्र्यांनी जें रामदासाचें वचन सांगितलें आहे, तें मीही सांगतें. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेंच पाहिजे.'

या शास्त्रीबोवांनी 'गोरक्षण'च्या 'समर्थ' विशेषांकांत एक सैल लेख

लिहिला आहे. त्यांच्याशिवाय बाकीचे सगळे लोक चुकले आहेत, त्यांना उपदेश करायचा ते आव आणतात. रूढीला चिकटणारे चूकच, रूढीच्या विरुद्ध ओरड करणारेही चूकच, आणि दोन्ही पक्षांचा नीट विचार करून सत्य बाहेर काढण्याचा प्रयत्न करणारेही चूकच ! आणि या सर्वांना चूक ठरवणारे हे शास्त्रीबोवा सांगतात काय ? की आगगाडी झाल्यावर लोकांनीं बैलगाड्यांतून जायचें सोडून दिलेंच की नाहीं ? तसें कांहीं नवमतवाद्यांनी करून दाखवावें म्हणजे सुधारणा आपोआप होईल ! आगगाडीची कल्पनाच पूर्वी नसल्यामुळें आगगाडी धर्मांत शिरली नव्हती, परंतु गलबताची कल्पना पूर्वी होती, त्यामुळें समुद्रपर्यटनावर धर्मांत निर्बंध मानतात. ज्या कल्पना धर्मांत पाप मानलेल्या आहेत, त्यांविरुद्ध कांहीं करायचें असल्यास तें एकट्यादुकट्याने करून भागत नाहीं, त्याने सुधारणा होण्याऐवजीं एखाद दुसरा मनुष्यच समाजांतून वेगळा निघतो, किंवा त्याला यापेक्षांही कडक शिक्षा होऊन तो तुरुंगांत देखील जाऊन बसतो. उदाहरणार्थ फ्रान्समध्यें संततिनियमनाचा तोंडी पुरस्कार करणाराला देखील तुरुंगांत जावें लागतें, मग प्रत्यक्ष आचरणाची गोष्टच नको ! अर्थात् चोरून सगळेंच चालतें, पण त्याचा लोकांना उपयोग नाही. अशा स्थितींत लोकमताची तयारी झाल्याशिवाय कोणतीही सुधारणा होत नाही. उदाहरण घालून देणारे लोकही लागतातच, परंतु ' क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ' हें समर्थांचें वचन तेथे खरें ठरत नाहीं. अशा ठिकाणीं क्रियेवीण वाचाळतेचा देखील अतिशय उपयोग असतो.....

रसेलचीं मतें पुष्कळांना समजलेलीं नसतात, तरीपण त्याचा आधार दिल्याशिवाय राहवत नाही. शास्त्रीबोवा रसेलचा उतारा देतात, " उत्कृष्ट मानवी जीवन सहजासहजी साध्य होत नसून त्याकरतां विद्या, संयम व सहानुभूति यांचें अगोदर प्रयत्नपूर्वक बीजारोपण करावें लागतें. " संयम हा शब्द शास्त्रीबोवाना जरी आवडला असला, तरी तो रसेलच्या अर्थाने आवडेल की नाही याची शंका आहे. रसेल स्पष्ट म्हणतो की संयमाचा उपयोग प्रेमासारखी उदार मनोवृत्ति दडपून टाकण्याकडे न करतां, असूयेसारखी रानटी मनोवृत्ति

नाहीशी करण्याकडे करणें योग्य होईल. पतिपत्नींनी कांहीं अटींवर एकमेकांना समागमस्वातंत्र्य द्यावें हें रसेलचें मत प्रसिद्धच आहे, तेव्हा त्याच्या लेखांतले सोईप्रमाणे पाहिजे तेवढे शब्द उचलले म्हणजे तें रसेलचें मत होत नाहीं आणि असे उतारे देण्यांतही कांही अर्थ नाही.

भास्करराव जाधवांनी हनुमान ब्रह्मचारी नव्हता असा पुरावा दिला आहे. त्याला पोकळ, पोंचट, भुसभुशीत, वगैरे विशेषणें लावून तो दिवेकरशास्त्र्यांनी खोटा ठरवला आहे. मला वाटतें एक पुरावा असा दिला आहे की रावणवधानंतर परत आल्यावर सर्वांना जी बक्षिसें वांटलीं त्यांत हनुमानाला सोळा स्त्रिया नजराणा म्हणून दिल्या असा रामायणांत उल्लेख आहे, आणि 'या मला नको' असें तो म्हणाला नाहीं. तेव्हा हा एक अप्रत्यक्ष पुरावा होतोच, पण हनुमानासारखा नांवाजलेला वीर ब्रह्मचारी असला तर तें भरताला वगैरे माहीत असतें आणि त्यानें त्याला सोळा बायका पाठवण्याचा प्रमाद केला नसता. निदान तें वाल्मीकीला माहीत असलें पाहिजे, तेव्हा त्याने असें भलतेंच वर्णन कसें दिलें? तो ब्रह्मचारी असला तरी माझें कांहीच नुकसान नाही, पण इतिहासांत जशा अनेक थापा सांपडतात, तशा लोकांच्या अनेक खोट्या समजुतीही असतात. तुकारामाचें सदेह वैकुंठगमन ही जशी एक उघड थाप आहे, तशीच ही ब्रह्मचर्याचीही असणें शक्य आहे. त्यांत दिवेकरशास्त्र्यांना चिडण्यासारखें काय आहे? गोरक्षणकारांनीं त्यांचा उतारा दिला हें ठीकच आहे, कारण ज्यांना बैल अंतर्ज्ञानी आहे हें खरें वाटतें, त्यांना वानर ब्रह्मचारी होता हेंही खरें वाटलें तर नवल नाहीं. वास्तविक ब्रह्मचर्य हा मनुष्याचा मूर्खपणा आहे, तो वानरांपर्यंत पोंचला असेलसें वाटत नाही, कारण तो कांहीं सांसर्गिक रोग नव्हे!

'गाय पाळणें आर्थिक दृष्ट्या फायदेशीरच आहे,' या विषयावर निबंधाला 'गोरक्षण'च्या संपादकांनीं बक्षिस लावलें आहे. हें जर खरें आहे, तर मग गोरक्षणाकरतां भीक कां मागावी लागते? भीक मागितल्यानें धार्मिक लोकांकडून फुकटचे पैसे उकळतां येतात, दुसरें काय?

तुझी **शारदा**

पोंच व अभिप्राय

—:०:—

उमलते गुलाब, लेखक, नारायण रामचंद्र अंबीकर व लक्ष्मण नारायण भावे. प्रकाशक, खंडेराव त्र्यंबक मुळे, ॲड्व्होकेट्, कल्याण. पृष्ठसंख्या ११९. किंमत बारा आणे.

या पुस्तकांत पहिल्या लेखकाच्या आठ व दुसऱ्याच्या सात लघुकथा आळीपाळीने छापल्या आहेत. हल्लीच्या लघुकथांच्या संग्रहांत सर्वच लघुकथा नसतात, तसेंच यांतही दिसतें. अशा पुस्तकांस लघुलेखसंग्रह म्हटल्यास बरें. यांतील कांही लघुकथा उघडउघड पुरुषी मतप्रचाराच्या दृष्टीनें लिहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ श्री. भावे यांची 'अश्रूंचें मोल'. यांत एक तरुणी आपली नोकरी सोडून तेथे एका ओळखीच्या पुरुषाला नेमण्याची शिफारस करते, कारण तो बी. ए. असून पोस्टाच्या शिपायाचें काम करावें लागल्यामुळे रडतांना तिला दिसला. असल्या पुरुषाबद्दल आम्हास फारशी सहानुभूति वाटत नाही. स्त्रियांनी नोकऱ्या केल्यामुळे बेकारी वाढते, हें तत्व सिद्ध करण्याकरतां ही गोष्ट लिहिली आहे. बेकारी हा शब्द फक्त पुरुषांनाच लागू आहे, आणि अर्थात् स्त्रियांना पैसे मिळवण्याचें कारण नाही, त्यांना पोसायला पुरुष आहेतच, हेंही तत्व त्यांत सिद्ध होतें! तसें म्हणायचें नसेल तर या गोष्टीने कांहीच सिद्ध होत नाही. मतप्रचाराकरतां लिहिलेल्या गोष्टी सामान्यतः गचाळच असतात आणि तशा यांतल्या बऱ्याच गोष्टी आहेत. कोणत्याही गोष्टीने कोणतेंही तत्व सिद्ध होत नाही, किंवा पाहिजे तें तत्व सिद्ध करतां येतें, ही गोष्ट लोकांच्या लक्षांत कां येत नाही? मतप्रचारामुळे बिघडली नाही अशीही एक गोष्ट या संग्रहांत दिसते, कारण श्री. अंबीकर यांच्या 'हें सारें स्वप्नच!' या गोष्टींत जरी स्त्रियांनीं नाटकांत किंवा सिनेमांत काम करण्याविरुद्ध मतप्रचार आहे, तरी तीं मतें गोष्टीच्या नायकावर लादतां येतात. त्यांच्याच 'भीषण भविष्य' या

गोष्टींत एक भविष्य खरें करून दाखवलें आहे, आणि आपण लवकर मरणार अशा भविष्यावर विश्वास ठेवून एक मनुष्य विवाहास कबूल होत नाही, याबद्दल त्याची स्तुति केली आहे. हें मूर्खपणाला उत्तेजन आहे. त्यांचीच 'पोरींचें नशीब' ही गोष्ट अत्यंत निरर्थक आहे. दोन माणसांचा प्रेमविवाह ठरल्यावर तो मनुष्य अपघातानें मरतो, या गोष्टींचें तात्पर्य इतकेंच निघेल कीं केव्हा काय होईल याचा नियम नाही. पात्रें आपणच निर्माण करतों, तेव्हा तीं आपल्याला पाहिजे तेव्हा आणि पाहिजे तशीं मारायला काय हरकत आहे, असा ईश्वरासारखा पोक्त विचार करून लेखक आपल्या पात्रांना निष्कारण मारूं शकतात, पण तसें करण्यांत कांही स्वारस्य असतें असें नाही. एक मनुष्य सकाळीं उठला, त्याला झोपही चांगली आली होती आणि हवाही चांगली होती, तेव्हा तो मोठ्या प्रसन्न मनःस्थितींत घराबाहेर पडला, आणि एक घराचें बांधकाम चालत होतें तथून जातांना डोक्यावर एक बहाल पडून त्याचा तत्काळ प्राण गेला, यालाही पाहिजे तर लघुकथा म्हणावें. पण वस्तुतः हा पोरकटपणा आहे. लहान मुलाच्या हातांत चाकू दिला म्हणजे तो पाहिजे तें कापीत सुटेल, तसे हे लेखक लेखणीचा प्रथमच उपयोग करूं लागले म्हणजे फटकाऱ्यासरसे पाहिजे त्याला मारतात, त्याला ताळतंत्र नाहीं. पण गोष्टीला तंत्र काय करायचें, असें एक मत आहेच! गोष्टीच्या भाषेत निष्काळजीपणा आणि कधीकधी अज्ञान दिसतें. मराठी गोष्टींत इंग्रजी शब्द आणल्याशिवाय राहवलेंच नाही तर ते इंग्रजी शब्द तरी आपल्याला माहीत असलेले योजावे, आणि मराठी शब्दांच्याही अर्थाकडे थोडें लक्ष देणें जरूर आहे. उदाहरणार्थ 'इलेक्ट्रिकच्या दिव्यांचा उजेड' (पान ५), "एक्स्प्रेस आज थोडीशी 'बिफोर-टाइमच' आली" (पान २०), 'कित्येक वेळां लीलेची स्थिति जास्त होई (पान ५३), 'किंचित् सलज्जतेने तर किंचित् त्रस्त मुद्रेने खाली उतरली' (पान ६१), "डाक्टरांनाही 'केस' बरोबर 'डायग्नॉनाइज' होईना 'ट्रीटमेंट' चालू होती" (पान ९६), यापेक्षा अधिक चांगलें मराठी कोणाही लेखकाला लिहितां यावें. पान २६ वर 'इदर काम कोण तुझा बाप करील?' हें साहेबाचें घेडगुजरी भाषण म्हणून घातलें आहे. या

साहेबाची जन्मभाषा मराठी असावी. उपमा दिलीच पाहिजे असा जुलुम कोणत्याही लेखकावर नसतो ती समर्पक असेल तरच तींत मौज आहे. त्यापेक्षां शुद्ध मराठी लिहिण्याकडे अधिक लक्ष दिलेलें बरें. पान ८० वर 'खिडकींत कोणींसें वाचींत बसलें होतें...निशाणाच्या रंगावरून ज्याप्रमाणें शत्रूची जात ओळखतां येते, त्याप्रमाणेच नेहमीच्या परिचयाच्या विश्वनाथाला पातळाच्या रंगावरून ती सुमनच आहे हें ओळखतां येणें अशक्य नव्हतें.' या चाणाक्ष विश्वनाथाचें आणि सुमनचें एकमेकांवर प्रेम होतें, तर मग 'शत्रूची जात' कशाला मधे आली ? भिकारी ओरडून त्रास देतात, त्यांचेसंबंधी पान ९३ वर एक मॅजिस्ट्रेट उद्गारतात, 'मारे एकमेकांना फोडून काढले पाहिजेत.' 'एकमेकांना' म्हणजे काय ? पान ११७ वरील 'शारीरिक सौंदर्यावर लुब्धता, हें आमच्या मैत्रीचें कारण असण्याइतकें सांसारिक ज्ञान सुदैवाने आम्हाला कोणालाच नव्हतें,' याचा अर्थ करायला बृहस्पतिच आणला पाहिजे ! कामवासना उद्भवण्यापूर्वीच्या वयाचें हें वर्णन आहे, अशी कल्पना पुढील वाक्यावरून येईल:—'आणि त्या निर्मल वातावरणांतला अविकारी आनंद आम्ही मनसोक्त लुटीत होतों,' पण पहिलें वाक्य इतकें वांकडेंतिकडें करण्याचें प्रयोजन काय ? असल्या वाक्यांचा वाचकांना विचार करायला लावण्यांत कोणाचाच फायदा नाही. तथापि यांतल्या कांही गोष्टी बऱ्या आहेत.

अल्लाहका प्यारा. स्वतःला ईश्वराचे जानी दोस्त समजणाऱ्या श्री. गांधींबद्दल (पदव्या बंद केल्यामुळे त्यानां आता महात्मा किंवा डाक्टर म्हणतां येत नाही) ईश्वराला मोठेंसें प्रेम वाटतें असें दिसत नाही. उलट त्याला त्यांचीं मतेंही पसंत नाहीत, आणि कृतींही पसंत नाही असा पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ कॉंग्रेसच्या छावणींत आग लागली, वादळ झालें, झोपड्या उडून गेल्या, त्यांच्या एका अनुयायाची मुलगी मेली, एक स्वयंसेवक नदींत बुडून मेला व दुसरा न्युमोनिया होऊन मेला. मागें एकदां श्री. गांधीनी देवी टोंचण्याविरुद्ध मत दिलें असतां ताबडतोब त्यांच्या एका अनुयायाच्या मुलीला देवी येऊन ती मेली. मित्रप्रेमाची महति काय वर्णावी !

चालः--मुद्रिके, अगोचरपथें, आलिस तूं इथे,...

एकदा, एकदा पाहुनी मनीं,

पेटती झणीं,

विविध संचार । देहांत मदन बेकार ॥ १ ॥

ठाउकें, ठाउकें नांव नच गांव,

घेतला ठाव,

कसा कोणीं । हृदयांत हळुच शिरुनी ॥ २ ॥

एकही एकही शब्द नच कळे,

बोल वेगळे,

मूर्ति परकी । छातींत भरालि धडकी ॥ ३ ॥

उमजती, उमजती बोल प्रीतिचे,

हेतु हृदयिंचे,

सर्व लोकीं । पाहुनी एकमेकीं ॥ ४ ॥

शकुंतला परांजपे.